मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीरातीसाठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com » पुणे, पिंपरी-चिंचवड » बुधवार, दि. 14 जानेवारी 2026 | पान- 1

# एअर बलूनच्या माध्यमातून मतदान जनजागृती

## महापालिकेचा स्वीप उपक्रमांतर्गत जनजागृतीपर कार्यक्रम महानगरपालिकेचा अनोखा उपक्रम

**पिंपरी | प्रतिनीधी**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीत मतदानाची टक्केवारी वाढावी यासाठी 'स्वीप' अंतर्गत विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. याचाच एक भाग म्हणून शहरामध्ये विविध ठिकाणी एअर बलूनच्या माध्यमातून मतदान जनजागृती करण्यात आली आहे.

पिंपरी चिंचवड महापालिका निवडणुकीसाठी १५ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० या वेळेत मतदान होत आहे. या अनुषंगाने महापालिका आयुक्त तथा निवडणूक अधिकारी श्रावण हर्डीकर यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर व उपायुक्त अण्णा बोडदे यांच्या अधिपत्याखाली मतदान




जनजागृतीसाठी विविध स्वीप उपक्रम राबवण्यात येत आहे.

या अंतर्गत शहरामध्ये पिंपरी चिंचवड महापालिकेची मुख्य प्रशासकीय इमारत, भक्ती शक्ती चौक, डांगे चौक थेरगाव, भोसरी येथील अंकुशराव लांडगे नाट्यगृह, रावेत येथील मुकाई चौक,पिंपळे गुरव येथील डायनॉसोर उद्यान,तळवडे चौक,च-होली अशा विविध ठिकाणी एअर बलूनच्या माध्यमातून मतदान जनजागृती करण्यात आली आहे. या बलूनवर मतदार जनजागृतीपर संदेश देण्यात आले असून येत्या १५ जानेवारी रोजी पिंपरी चिंचवड महापालिका निवडणुकीत प्रत्येक पात्र मतदाराने मतदानाचा हक्क बजावावा, असे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

> लोकशाही मजबूत करण्यासाठी प्रत्येक पात्र नागरिकाने मतदान करणे अत्यंत आवश्यक आहे. एअर बलूनसारख्या नाविन्यपूर्ण माध्यमातून राबविण्यात आलेला उपक्रम नागरिकांमध्ये मतदानाबाबत सकारात्मक जागरूकता निर्माण करत असून, जास्तीत जास्त मतदारांनी १५ जानेवारी रोजी मतदानाचा हक्क बजावावा.
>
> – तृप्ती सांडभोर, अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका.

> पिंपरी चिंचवड महापालिका सार्वत्रिक निवडणुकीत मतदानाची टक्केवारी वाढविण्याच्या दृष्टीने स्वीप अंतर्गत विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. एअर बलूनच्या माध्यमातून दिला जाणारा संदेश सर्वसामान्य नागरिकांपर्यंत सहज पोहोचत असून, प्रत्येक पात्र मतदाराने मतदान प्रक्रियेत सक्रिय सहभाग घ्यावा.
>
> – अण्णा बोडदे, उपायुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका.

---

# नवोदीत मतदारांसह शेकडो युवकांनी घेतली मतदानाची शपथ

## नवोदीत मतदार पहिल्यांदाच मतदान करणार; उत्सुकता व आनंद

**पिंपरी | प्रतिनिधी**

प्रत्येक मत हे लोकशाहीचे बळ आहे. मतदार यादीत नाव असलेल्या प्रत्येकाने आपले मतदानाचे कर्तव्य पार पाडावे,शिवाय सामाजिक बांधिलकीतून आपले कुटुंबीय, मित्रपरिवार तसेच परिसरातील नागरिकांनाही मतदानासाठी प्रेरित करावे.भारतीय संविधानाने दिलेला मतदानाचा महत्त्वपूर्ण हक्क बजावून लोकशाही बळकट करण्यासाठी प्रत्येकाने मतदान करणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन महापालिकेचे जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांनी केले.



पिंपरी चिंचवड महापालिका निवडणूक १५ जानेवारी २०२६ रोजी होत असून या अनुषंगाने महापालिका आयुक्त तथा निवडणूक अधिकारी श्रावण हर्डीकर यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर व उपायुक्त अण्णा बोडदे यांच्या अधिपत्याखाली मतदान जनजागृतीसाठी स्वीप उपक्रम राबविण्यात येत आहे. या अंतर्गत निगडी येथील लाईट हाऊस येथे युवकांसाठी मतदान जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन जनता संपर्क अधिकारी पुराणिक यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले होते. यावेळी ते बोलत होते.

याप्रसंगी लाईट हाऊसचे पूजा मोगरे, लखन रोकडे, अभिजित कांबळे, दिपाली वाघुळे, अक्षता घारे, लुईस शेळके, छवी राठोड यांच्यासह शेकडो विद्यार्थी, युवक उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला मतदान जनजागृतीवर आधारित पथनाट्याचे सादरीकरण करण्यात आले. या पथनाट्याद्वारे प्रत्येक मताचे लोकशाहीमध्ये असणारे महत्त्व विशद करण्यात आले. युवकांनी टाळ्यांची साथ देत पथनाट्य सादरीकरण करणाऱ्या टीमचे कौतुक केले. त्यानंतर उपस्थितांना लोकशाहीमध्ये प्रत्येक मत हे अमूल्य असून त्याचे महत्त्व किती आहे, याबाबत युवकांना जनता संपर्क अधिकारी पुराणिक यांनी माहिती दिली. त्यानंतर या कार्यक्रमात उपस्थित सर्व युवकांनी मतदानाची शपथ घेत येत्या महापालिका निवडणुकीत १००% मतदान करण्याचा निर्धार व्यक्त केला.

# शांततापूर्ण मतदानासाठी पोलिस यंत्रणा सज्ज

## आचारसंहितेच्या काळात 16 लाख 17 हजार 400 रुपयांची रोकड ताब्यात

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिका निवडणूक अंतिम टप्प्यात पोहोचली आहे. गुरुवारी मतदान व शुक्रवारी मतमोजणी होणार आहे. निवडणूक शांततापूर्ण, निर्भय व मुक्त वातावरणात पार पडावी, यासाठी पिंपरी-चिंचवड पोलिसांकडून मोठा बंदोबस्त व धडक कारवाया करण्यात आल्या. आचारसंहितेच्या काळात दैनंदिन तपासणीत १६ लाख १७ हजार ४०० रुपयांची रोकड ताब्यात घेतली.

पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत ४२० इमारतींमध्ये एकूण २,१३५ मतदान केंद्रे असून, निवडणूक प्रक्रियेदरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी सर्वंकष नियोजन केले आहे. निवडणूकपूर्व बंदोबस्तासाठी पोलीस आयुक्त विनय कुमार चौबे यांनी ३४ तपासणी पथके नियुक्त केली. यासह १,३०६ परवानाधारक शस्त्रे जमा केली. नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण करण्यासाठी १२ ठिकाणी रूट मार्च काढण्यात आले.



**९६२ व्यक्तींवर प्रतिबंधात्मक कारवाई**

आचारसंहिता लागू झाल्यापासून आतापर्यंत ९६२ व्यक्तींवर प्रतिबंधात्मक कारवाई केली. यामध्ये ५० उपद्रवी व्यक्तींना जिल्ह्याबाहेर पाठविले. 'एमपीडीए'अंतर्गत सात सराईत गुन्हेगारांना स्थानबद्ध, तर 'मोका'अंतर्गत नऊ टोळ्यांवर कारवाई करून ४७ गुन्हेगारांवर कठोर कारवाई केली. याशिवाय ३७ गुन्हेगारांना हद्दपार, तर ४३८ गुन्हेगारी प्रवृत्तीच्या व्यक्तींना स्थानिक क्षेत्राबाहेर जाण्याचे आदेश दिले.

### अवैध धंदे, अमली पदार्थांवर कारवाई

» अवैध मद्यविक्रीविरोधात २७६ छापे टाकून १० लाख ३६ हजार ९७२ रुपयांचा मद्यसाठा जप्त केला. एनडीपीएस कायद्यांतर्गत १८ छाप्यांत ६६ लाख १९ हजार ५३१ रुपयांचा गांजा, एमडी, अंमली पदार्थ जप्त केले.

### अवैध शस्त्रांविरोधात विशेष मोहीम

» आचारसंहिता कालावधीत नऊ अवैध पिस्तुले व २३ घातक शस्त्रे जप्त केले. १ नोव्हेंबर २०२५ ते ११ जानेवारी २०२६ या कालावधीतील विशेष मोहिमेत ९१ अवैध पिस्तुले व २२९ घातक शस्त्रे जप्त करून तीनशेहून अधिक गुन्हेगारांना अटक केली.

"निवडणुकीच्या अंतिम टप्प्यात नाकाबंदी, गस्त, गुन्हेगार तपासणी व रूट मार्च करण्यात आले. असामाजिक घटकांवर 'वॉच' आहे. कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी नागरिकांनी सहकार्य करावे.

- विनय कुमार चौबे, पोलीस आयुक्त, पिंपरी-चिंचवड.

अंमली पदार्थविरोधी विशेष मोहिमेत ५७ छापे घातले. यात ७६ लाख नऊ हजार ७०१ रुपयांचे अमली पदार्थ जप्त केले.

# महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूकीच्या मतदानाकरिता मतदानादिवशी सुट्टी

## मतदानासाठी सुट्टी अथवा सवलत न दिल्यास आस्थापनांवर कारवाई; कामगार उपआयुक्त निखील वाळके

**पिंपरी | प्रतिनिधी**

महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक-२०२५-२६ करीता मतदारांना मतदानाचा हक्क बजाविण्याकरिता १५ जानेवारी २०२६ रोजी कामगार विभागांतर्गत येणाऱ्या सर्व आस्थापनानी भरपगारी सुट्टी तथा सुट्टी देणे शक्य नसल्यास सवलत देण्यात यावी, असे आवाहन कामगार उपआयुक्त निखील वाळके यांनी केले आहे.

उद्योग, उर्जा, कामगार व खनिकर्म विभागाच्या ३० डिसेंबर २०२५ रोजीच्या परिपत्रकानुसार कामगार विभागांतर्गत येणा-या सर्व आस्थापना, कारखाने, दुकाने (उदा खाजगी कंपन्यामधील आस्थापना, सर्व दुकाने व इतर आस्थापना, निवासी हॉटेल, खाद्यगृहे, अन्य गृहे, नाट्यगृहे, व्यापार, औद्योगिक उपक्रम किंवा इतर आस्थापना तसेच माहिती व तंत्रज्ञान कंपन्या, शॉपिंग सेंटर, मॉल्स, रिटेलर्स आदी.) मधील कार्यरत अधिकारी, कर्मचारी, कामगार यांना भरपगारी सुट्टी देण्यात यावी तसेच अपवादात्मक परिस्थितीत पूर्ण दिवस सुट्टी देणे शक्य नसेल तेथे दोन ते तीन तासांची सवलत देण्याबाबत सूचित केले आहे.

कामगार विभागातंर्गत येणाऱ्या सर्व आस्थापना, कारखाने व दुकाने मालकांनी, व्यवस्थापनाने परिपत्रकातील निर्देशाचे तंतोतंत पालन करण्याची खबरदारी घ्यावी. आपल्या आस्थापनेतील अधिकारी, कर्मचारी, कामगार यांच्याकडून मतदानाकरीता भरपगारी सुट्टी अथवा सवलत न मिळाल्याची तक्रार कामगार कार्यालयास प्राप्त झाल्यास संबंधित आस्थापनेविरुध्द मा. निवडणूक आयोग व शासनाने निर्देशित केल्यानुसार कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी.



जिल्ह्यातील सर्व आस्थापना, कारखाने व दुकाने यामध्ये काम करणाऱ्या अधिकारी, कर्मचारी, कामगार यांनी आपल्या कार्यक्षेत्रातील निवडणूकीच्या दिवशी मतदान करण्यासाठी भरपगारी सुट्टी अथवा सवलत न दिल्यास अपर कामगार आयुक्त यांचे कार्यालय, पुणे विभाग व कामगार उप आयुक्त कार्यालयाच्या ALCPUNE5@GMAIL.COM व DYCL2021@GMAIL.COM या ई-मेल पत्त्यावर आस्थापनेचे नाव, जबाबदार अधिकाऱ्यांचे नाव व भ्रमणध्वनी क्रमांक नमूद करुन तक्रार दाखल करावी.

यासंदर्भात अधिक माहिती व तक्रारीकरिता सहाय्यक कामगार आयुक्त प्रविण बा. जाधव – ९५२९६११८०७, ग. स. शिंदे-९७३०१२११५२, द. दा. पवार- ९८२२७३३३७०. सु. तु. शिर्के- ७७७५९६६६०६, कै. ल. मुजमुले-९८२३९९७७२२ आणि अधीक्षक व. पं. सोनंदकर-९९६०५५७११६ यांच्या भ्रमणध्वनीवर संपर्क साधावा, असे आवाहन कामगार उपआयुक्त निखील वाळके यांनी केले आहे.

# पुणे महापालिका निवडणूक : 16 रोजी मतमोजणी, अंतिम निकाल रात्री उशिरा

## उमेदवारांची संख्या आणि फेऱ्यांमुळे काही प्रभागांचे निकाल उशिरा जाहीर होण्याची शक्यता

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे महापालिका निवडणुकांच्या मतमोजणीसाठी प्रशासनाने जय्यत तयारी पूर्ण केली असून, येत्या 16 तारखेला सकाळी 10 वाजता अधिकृत मतमोजणीला सुरुवात होणार आहे. दुपारी 4 वाजेपर्यंत बहुतांश प्रभागांचे निकाल जाहीर करण्याचा प्रशासनाचा प्रयत्न असला, तरी उमेदवारांची वाढलेली संख्या, प्रत्येक प्रभागासाठी लावण्यात आलेली टेबल व्यवस्था आणि मतमोजणीच्या अनेक फेऱ्यांमुळे अखेरच्या प्रभागाचा निकाल रात्री 10 वाजेपर्यंत लांबण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

शहरातील सर्व मतमोजणी केंद्रांवर सुरक्षेची कडेकोट व्यवस्था ठेवण्यात आली असून, प्रत्येक केंद्रावर पोलिस बंदोबस्त, सीसीटीव्ही यंत्रणा आणि प्रवेश-नियंत्रण यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली आहे. मतमोजणी प्रक्रियेत कोणताही गोंधळ होऊ नये, यासाठी प्रत्येक टेबलवर स्वतंत्र कर्मचारी, निरीक्षक आणि निवडणूक निर्णय अधिकारी नियुक्त करण्यात आले आहेत. यंदा चारसदस्यीय प्रभाग पद्धतीमुळे प्रत्येक प्रभागात उमेदवारांची संख्या मोठी आहे. त्यामुळे एका प्रभागासाठी मतमोजणीच्या अनेक फेऱ्या घ्याव्या लागणार आहेत. सर्व क्षेत्रीय कार्यालयांतर्गत असणाऱ्या मतमोजणी केंद्रांवर एका प्रभागाची मतमोजणी पूर्ण करून निकाल जाहीर केले जाणार आहे. त्यानंतर दुसऱ्या प्रभागाची मतमोजणी सुरू केली जाणार आहे.

मतमोजणीसाठी 15 केंद्रांवर एकूण 335 मतमोजणी टेबल ठेवण्यात आले आहेत. यातील 38 टेबल टपाली मतदानासाठी, तर उर्वरित 297 टेबल मतदान यंत्रासाठी राहणार आहेत. एका प्रभागासाठी कमीत कमी 4 आणि जास्तीत जास्त 12 फेऱ्या होणार आहेत. मतमोजणी सकाळी 10 पासून सुरू होणार आहे. दुपारी तीन वाजेपर्यंत निकाल स्पष्ट करण्याचा प्रयत्न असला तरी एका फेरीसाठी साधारण 35 ते 45 मिनिटे लागणार आहे. मात्र, काही प्रभागांत उमेदवारांची संख्या मोठी आहे. येथे मतमोजणीसाठी टेबलांची संख्या वाढवण्यात आली असली तरी फेऱ्यांची संख्या जास्त असल्याने निकाल येण्यास उशीर लागणार आहे. त्यामुळे प्रशासनाचा लवकरात लवकर निकाल जाहीर करण्याचा प्रयत्न असला तरी, अंतिम प्रभागाचा निकाल हाती येण्यास 10 वाजण्याची शक्यता आहे. काही मोठ्या आणि चुरशीच्या प्रभागांचे निकाल उशिरा जाहीर होण्याची शक्यता आहे. अंतिम निकाल जाहीर होईपर्यंत संपूर्ण प्रक्रिया निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार पार पडणार आहे. महापालिकेच्या 41 प्रभागांसाठी 165 जागा आहेत. यासाठी 1 हजार 155 उमेदवार रिंगणात आहेत. 41 प्रभागांमध्ये 4 सदस्यीय 49 प्रभाग आहेत, तर प्रभाग क्रमांक 38 हा पाचसदस्यीय आहे.




### एका एका प्रभागाचा निकाल होणार जाहीर

» महापालिका निवडणुकीच्या मतमोजणीसाठी प्रशासनाने तयारी पूर्ण केली आहे. 15 क्षेत्रीय कार्यालयांतर्गत ही मतमोजणी पार पडणार असून, एका क्षेत्रीय कार्यालयांतर्गत दोन ते तीन प्रभागांचा समावेश आहे. निकाल लवकर लावण्यासाठी प्रशासनाने एका वेळी एका प्रभागाची मतमोजणी करण्याचा निर्णय घेतला आहे. मतमोजणीच्या सर्व फेऱ्या पूर्ण झाल्यावर निकाल जाहीर केला जाणार आहे. त्यानंतर दुसऱ्या प्रभागाच्या मतमोजणीला सुरुवात केली जाणार आहे, अशी माहिती प्रशासनाने दिली.

### विशेष आराखडा तयार

» राजकीय पक्ष, उमेदवार आणि कार्यकर्त्यांचे लक्ष मतमोजणीकडे लागले असून, सकाळपासूनच मतमोजणी केंद्रांच्या परिसरात मोठी गर्दी होण्याची शक्यता आहे. त्यामुळे वाहतूक नियंत्रण, जमावबंदी आणि कायदा-सुव्यवस्थेच्या दृष्टीने पोलिसांनी विशेष आराखडा तयार केला आहे. प्रशासनाचा प्रयत्न दुपारपर्यंत शहराच्या सत्तेचे चित्र स्पष्ट करण्याचा असला, तरी खऱ्या अर्थाने पुण्याच्या महापालिकेचा अंतिम सत्ता समीकरण रात्री उशिरापर्यंतच ठरण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

> महापालिका निवडणुकीच्या मतमोजणीची तयारी पूर्ण झाली आहे. एका प्रभागाचा निकाल लागल्यावर दुसऱ्या प्रभागाची मतमोजणी सुरू केली जाणार आहे. पहिल्या दोन तासांत पहिला निकाल येण्याची शक्यता आहे. 4 वाजेपर्यंत सर्व निकाल लावण्याचा आमचा प्रयत्न आहे. यासाठी काही ठिकाणी मतमोजणीसाठी जादा टेबलांची देखील व्यवस्था करण्यात आली आहे. काही ठिकाणी उमेदवारांची संख्या जास्त आहे, तेथील निकाल लावण्यासाठी देखील नियोजन करण्यात आले आहे.
>
> \- ओमप्रकाश दिवटे, अतिरिक्त आयुक्त तथा निवडणूक निर्णय अधिकारी

# पुण्याला बनवणार सर्वोत्तम 'नॉन-कॅपिटल सिटी'; मुरलीधर मोहोळांनी व्यक्त केला विश्वास

## महाराष्ट्र हे देशाचे ग्रोथ इंजिन, तर पुणे हे महाराष्ट्राचे ग्रोथ इंजिन बनले आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

राजधानीचे शहर नसूनही पुण्याने गेल्या दहा वर्षांत देशाच्या अर्थकारणात अभूतपूर्व योगदान दिले आहे. महाराष्ट्र हे देशाचे ग्रोथ इंजिन, तर पुणे हे महाराष्ट्राचे ग्रोथ इंजिन बनले आहे. आपल्या पुण्याला देशातली सर्वोत्तम नॉन-कॅपिटल सिटी बनवण्याचे स्वप्न भारतीय जनता पार्टी पूर्ण करू दाखवेल, असा विश्वास केंद्रीय राज्यमंत्री आणि पुण्याचे खासदार मुरलीधर मोहोळ यांनी व्यक्त केला.

महापालिका निवडणूक प्रचाराच्या निमित्ताने मोहोळ यांनी प्रभातशी संवाद साधला. त्या वेळी भाजपाच्या संकल्पांविषयी ते बोलत होते. ते म्हणाले, की २०४७ पर्यंत देशाला विकसित करण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी कष्ट करत आहेत. महाराष्ट्राला एक ट्रिलियन डॉलरची अर्थव्यवस्था बनविण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस प्रयत्नशील आहेत. या दोन्ही स्वप्नपूर्तीमध्ये पुण्याचा लक्षणीय वाटा असणार आहे. म्हणूनच महापालिकेच्या माध्यमातून पुण्याची सर्वांगीण प्रगती करण्याचा भाजपाचा निर्धार आहे.

मोहोळ म्हणाले, की २०१४ नंतर देशात व राज्यात भाजपाचे सरकार आले. गेल्या अकरा वर्षांच्या मर्यादित कालखंडात पुण्याने विकासाची अनेक शिखरे गाठली. मोदी सरकार पुण्याला भरभरून देत आहे. ठळक उदाहरणे सांगायचे, तरी भली मोठी यादी होईल. मेट्रोचे स्वप्न मोदींमुळे साकारले. प्रदूषण रोखणाऱ्या प्रत्येकी एक हजार इलेक्ट्रिक आणि सीएनजी बस सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेत येत आहेत.

मोदींनी विमानतळ विस्तारीकरण केल्याने, देशातल्या पहिल्या दहा विमानतळांमध्ये पुण्याचा समावेश झाला. पंतप्रधान आवास योजनेतून २६ हजारांपेक्षा जास्त मध्यमवर्गीयांना हक्काचे घर मिळाले. सर्वसामान्यांसाठी अटलबिहारी वाजपेयी रुग्णालय केंद्राच्या मदतीतून सुरू झाले.

पुणे महापालिकेत अवघ्या पाच वर्षात भाजपाने केलेली विकासकामे पुणेकरांनी पाहिली आहेत. पुणेकरांचा कौल प्रचारात स्पष्ट दिसतोय. महापालिकेत पुन्हा भाजपालाच संधी देणार. उज्ज्वल भविष्यासाठी पुण्यात भाजपाच हवी, असे मोहोळ म्हणाले.



> 'पुढच्या पाच वर्षांत कात्रज, खडकवासला, खराडी, वाघोली, लोणी काळभोर, सासवडपर्यंत मेट्रो पोहोचवू. पुणे विमानतळापर्यंतही थेट मेट्रोने जाता येईल, असा मार्ग आम्ही प्रस्तावित केला आहे. पुणे विमानतळाचा विस्तार, एम्स रुग्णालय, भारत मंडपमसारखे कन्व्हेन्शन सेंटर, पुणे-मुंबई द्रुतगती मार्गाला समांतर महामार्ग, जीसीसी-डेटा सेंटर हब यासाठी मी दिल्लीतून प्रयत्न करणार आहे. त्यासाठी पुणेकर भाजपाला आशीर्वाद देतील, असा विश्वास आहे.'-
>
> \- मुरलीधर मोहोळ, केंद्रीय राज्यमंत्री

# पुणे महापालिका मतदानासाठी 12 हजार पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त

## 125 संवेदनशील इमारतींवर विशेष लक्ष; शांततेत मतदानासाठी पुणे पोलिस सज्ज

**पुणे | प्रतिनिधी**

महापालिका निवडणुकीचे गुरुवारी (दि. 15) मतदान होणार आहे. त्या पार्श्वभूमीवर पोलिसांनी शहरात मोठा बंदोबस्त तैनात केला असून, मतदान केंद्रे असलेल्या 125 संवेदनशील इमारतींवर विशेष लक्ष केंद्रित केले आहे. पूर्वी घडलेल्या घटनांच्या अनुषंगाने पोलिसांकडून ही तयारी केल्याचे वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांनी सांगितले.

मतदान प्रक्रिया शांततेत पार पडावी, कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष सुरक्षा व्यवस्था राबवली आहे. संवेदनशील इमारतीवर अतिरिक्त पोलिस अधिकारी व अंमलदार तैनात केले असून, सतत पेट्रोलिंग, क्यूआरटी पथके आणि स्ट्रायकिंग फोर्स सज्ज ठेवली आहे. स्थानिक पोलिस ठाण्यांसह गुन्हे शाखेचे विशेष लक्ष यावर राहणार असून, कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्यास तत्काळ कारवाई केली जाणार आहे.

शहरात वरिष्ठ अधिकाऱ्यांपासून पोलिस अंमलदारांपर्यंत तब्बल 12 हजारांहून अधिक पोलिसांचा बंदोबस्त तैनात केला आहे. मतदान प्रक्रिया शांततेत आणि सुरळीत पार पडावी, यासाठी सर्व पातळ्यांवर नियोजन केले आहे. संवेदनशील मतदान केंद्रांवर विशेष लक्ष ठेवले जाणार असल्याची माहिती पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांनी दिली.

पोलिस आयुक्त अमितेश कुमार, सहआयुक्त रंजनकुमार शर्मा, अपर पोलिस आयुक्त पंकज देशमुख, संजय पाटील, मनोज पाटील आणि राजेश बनसोडे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रत्येक झोनमध्ये पोलिस उपायुक्तांच्या देखरेखीखाली मतदान प्रक्रिया शांततेत पार पाडण्यासाठी पुणे पोलिस सज्ज आहेत. बाहेरच्या जिल्ह्यातून सुद्धा अतिरिक्त बंदोबस्त मागवला असून, त्यामध्ये वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांचा समावेश आहे.




### एआयवर सुरू उसाची उत्सुकता

» शहरातील कायदा आणि सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी प्रत्येक मतदान केंद्रावर चारस्तरीय सुरक्षा व्यवस्था राबवली जाणार आहे. यात पोलिस अंमलदार, वरिष्ठ पोलिस निरीक्षक, सहायक पोलिस आयुक्त आणि उपायुक्त स्तरावरील अधिकाऱ्यांचा समावेश असेल.

» कोणताही अनुचित प्रकार, वाद किंवा गोंधळ होऊ नये, यासाठी स्थानिक पोलिस ठाण्यांसह गुन्हे शाखेची पथके सतर्क ठेवली आहेत. पुणे शहरात एकूण 3 हजार 983 मतदान केंद्रे असून, प्रत्येक केंद्रावर किमान एक पोलिस कर्मचारी तैनात केला जाणार आहे.

» तब्बल 913 इमारतींत मतदान प्रक्रिया पार पडणार असून, त्या ठिकाणी प्रत्येकी दोन पोलिस अंमलदारांची नियुक्ती केली आहे. प्रत्येक पोलिस ठाण्याच्या हद्दीत सातत्याने पेट्रोलिंग केले जाणार आहे.

» मतदानाच्या काळात शहरातील कायदा-सुव्यवस्थेची जबाबदारी स्थानिक पोलिस ठाण्यांसोबतच गुन्हे शाखेवरही असेल. यासाठी शहरात 454 झोन तयार करण्यात आले आहेत.

» संबंधित झोनमध्ये वरिष्ठ पोलिस निरीक्षक आणि सहायक पोलिस आयुक्तांच्या मार्गदर्शनाखाली बंदोबस्त ठेवण्यात येणार आहे. संवेदनशील इमारतीच्या ठिकाणी एक अधिकारी आणि पाच पोलिस कर्मचारी नियुक्त केले जाणार आहेत.

### एका दृष्टीक्षेपात बंदोबस्त

» पोलिस आयुक्त - 1, सहआयुक्त - 1, अपर पोलिस आयुक्त - 4, पोलिस उपायुक्त - 14, पोलिस अधिकारी व अंमलदार - 7,000 होमगार्ड - 3,000, एसआरपीएफ - 4 कंपन्या, बाहेरून मागवलेले अधिकारी-कर्मचारी - 1,500, दुचाकीद्वारे पेट्रोलिंग - 500 कर्मचारी, क्यूआरटी - 8.

### शांततेत मतदानासाठी पुणे पोलिस सज्ज

» मतदान प्रक्रिया शांततेत पार पडावी, कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष सुरक्षा व्यवस्था राबवली आहे. संवेदनशील इमारतीवर अतिरिक्त पोलिस अधिकारी व अंमलदार तैनात केले असून, सतत पेट्रोलिंग, क्यूआरटी पथके आणि स्ट्रायकिंग फोर्स सज्ज ठेवली आहे. स्थानिक पोलिस ठाण्यांसह गुन्हे शाखेचे विशेष लक्ष यावर राहणार असून, कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्यास तत्काळ कारवाई केली जाणार आहे.

# खंडोबाचीवाडीत खडी क्रशरला कडाडून विरोध

## खंडोबाचीवाडी (ता. बारामती) ग्रामस्थांनी एकजूट दाखवत ग्रामसभेत संभाव्य दगडखाण व खडी क्रशरला तीव्र विरोध केला आहे

**पुणे | प्रतिनिधी**

खंडोबाचीवाडी (ता. बारामती) ग्रामस्थांनी एकजूट दाखवत ग्रामसभेत संभाव्य दगडखाण व खडी क्रशरला तीव्र विरोध केला आहे. मोठ्या संख्येने ग्रामस्थांनी आपल्या गावाच्या हद्दीत भविष्यातही कोणत्याही प्रकारचा खडी क्रशर उभारणी अथवा दारू विक्री करण्यास कायमस्वरूपी मनाई करण्याचा ठराव एकमताने घेतला आहे.



वाघळवाडी येथील समर्थ ज्ञानपीठाचे अध्यक्ष अजिंक्य सावंत व त्यांच्या कुटुंबातील सदस्यांनी १० डिसेंबरला खंडोबाचीवाडी ग्रामपंचायतीस अर्ज केला होता. खंडोबाचीवाडी हद्दीतील स्वमालकीच्या जमीनीवर दगडखाण व खडी क्रशर टाकण्यासाठी ना हरकत मिळावी, गावाला कुठलाही त्रास होणार नाही असे नमूद केले होते. अर्जानंतर ग्रामपंचायत हद्दीतील घुमटवस्ती, कन्हेरवाडी व खंडोबाचीवाडी गावठाण येथील सत्तर ग्रामस्थांनी खडी क्रशरच्या विरोधातील अर्ज ग्रामपंचायतला दिला. खाण व क्रशरमुळे ध्वनी व वायू प्रदूषण यामुळे नागरिक व जनावरांना त्रास होईल. धुळीने शेतीव्यवस्था आणि वनविभागातील वृक्षांवर प्रतिकूल परिणाम होईल, अशी भीती व्यक्त केली

त्यामुळे सरपंच संतोष धायगुडे यांच्या अध्यक्षतेखाली विठ्ठल-रूक्मिणी मंदिरात विशेष ग्रामसभेचे आयोजन केले होते. विरोध करण्यासाठी मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते. ग्रामसेविका सीमा गावडे यांनी अहवालवाचन केले. सावंत यांचा मागणी मांडण्यात आला. ज्या गटात खडी क्रशर होणार आहे. त्या गटातील शेतकऱ्यांनीही याला कडाडून विरोध केला आहे. डॉ. वसंत दगडे यांनी त्या ठिकाणी हॉस्पिटल उभारण्याचा अर्ज दिला. सर्व गोष्टींचा उहापोह झाल्यानंतर ग्रामस्थांनी एकमताने खडी क्रशरला 'ना हरकत देऊ नये' असा ठराव घेतला आहे. सोमेश्वर कारखान्याचे संचालक लक्ष्मण गोफणे यांनी सूचक तर संचालक शैलेश रासकर हे अनुमोदक आहेत.

### दारूविक्रीलाही विरोध

» खंडोबाचीवाडी गावाच्या हद्दीत भविष्यात कोणत्याही प्रकारचा खडी क्रशर, बिअर बार, मद्यविक्री, रासायनिक कारखाने, कला केंद्र यास कायमस्वरूपी बंदी घालण्याचा दूरगामी निर्णय दोनशेपेक्षा अधिक लोकांनी एकमताने घेतला आहे. तो भविष्यातील कार्यकारिणीसही बंधनकारक राहणार आहे, अशी माहिती सरपंच संतोष धायगुडे यांनी दिली. सावंत कुटुंबीयांना ठरावाबाबत कळविले असल्याचेही सांगितले..